*CNR-MHGA030007822024*

**कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गडचिरोली यांचे न्यायालय**

**(श्रीमती व्हि. आर. मालोदे यांचेसमक्ष)**

**<u>कौ.हि.म.स.मा.क्र.३०/२०२४</u>**

**सौ प्रणाली संदिप दुधे व इतर** ... अर्जदार

**. विरुध्द .**

**संदिप जागेश्वर दुधे** **...** गैरअर्जदार

---

**<u>आदेश नि.क्र.०७ खाली</u>**

(दिनांक ३१/०८/२०२४)

सदरचा अर्ज अर्जदार हिने कलम १८ आणि १९ कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा अंतर्गत अंतरिम संरक्षण मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार ही कथन करते की, तिने सदर मुख्य प्रकरण गैरअर्जदार विरुध्द कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा नुसार दाखल केले आहे. सदर प्रकरण प्रलंबीत असतांना गैरअर्जदार हा अर्जदार हिला विविध प्रकारे मानसिक त्रास देत आहे. तो अर्जदार हिचे राहते ठिकाणी जावुन तिच्या आईवडीलांसमोर तिला अश्लील भाषेत शिवीगाळ करुन तिच्या आईवडीलांचा अपमान होईल असे अश्लील शब्द वापरुन त्यांना जिवाने मारण्याची धमकी देत आहे. तसेच गैरअर्जदार हा अर्जदार हिचे आईवडीलांचे घरी जावुन तिला मारहाण करुन शारिरीक ईजा पोहोचवितो. त्यामुळे अर्जदारांचे जिवीतास धोका निर्माण झाला आहे. गैरअर्जदार हा सध्या स्थितीत राहत असलेल्या तिच्या माहेरी दारु पिवुन जाता आणि तिला मारहाण करतो. तसेच अर्जदार ही दुकानात, कामाचे ठिकाणी किंवा नातेवाईकांकडे गेली असता तेथे सुध्दा गैरअर्जदार हा अर्जदाराचा पाठलाग करीत जावुन तिला त्रास देतो. त्यामुळे अर्जदार हिने सदर अर्जान्वये संरक्षणाचा अंतरिम एकतर्फी आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे.

२. सदर अर्ज दाखल केल्यानंतर संबंधित संरक्षण अधिकारी यांचा अहवाल मागविण्यात आला. त्या अनुषंगाने त्यांनी त्यांचा अहवाल नि.क्र.०८ नुसार दाखल केला आहे. संबंधित अहवालाचे अवलोकन केले असता अर्जदार हिने तिच्या मुख्य अर्जात आणि सदरचा अर्ज यात गैरअर्जदाराविरुध्द केलेले आरोपास दुजोरा देणारे कथन संबंधित अहवालामध्ये नमुद आहे. सध्या स्थितीमध्ये अर्जदार आणि गैरअर्जदार एकाच गावातील रहिवासी असल्या कारणाने गैरअर्जदारकडुन अर्जदार हिला कुठल्याही प्रकारचा मानसिक, शारिरीक किंवा इतर त्रास होवु नये या संबंधित अर्जदार हिच्या बाजुने गैरअर्जदार विरुध्द या टप्याला कलम १८ अन्वये संरक्षण आदेश पारीत करणे आवश्यक आहे.

३. अर्जदार हिने संरक्षण आदेशासोबत कलम १९ अन्वये निवासी आदेशाची मागणी सुध्दा केली आहे, परंतु सध्या स्थितीला पुरेसे दस्ताऐवज सदर प्रकरणात दाखल करण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे प्रकरण हे अगदी सुरुवातीच्या टप्प्याला प्रलंबीत आहे. त्यामुळे सध्या स्थितीमध्ये ती तिच्या माहेरी राहत असल्याचे दिसुन येते. त्या कारणाने या क्षणाला तिला निवासी आदेश पारीत करणे योग्य वाटत नाही. त्यामुळे तिची निवासी आदेशाची प्रार्थना प्रलंबीत ठेवण्यात येवुन या क्षणाला ती गृहीत धरता येत नाही.

४. प्रस्तुत प्रकरण पुराव्याअंती निकाल लागण्यास वेळ लागु शकतो. परंतु या क्षणाला अर्जदार हिने मागणी केल्यानुसार गैरअर्जदार कडुन तिला, तिच्या आईवडीलांना, मुलांना किंवा तिचेशी संबंधीत कुठल्याही व्यक्तीला कुठलाही त्रास न होण्याकरीता सदरचा अर्ज अंशत: मंजुर करणे योग्य ठरते. परिणामत: खालीत आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. गैरअर्जदार याला आदेशित करण्यात येते की, त्याने अर्जदार हिला तिच्या घरी जावुन तिला, तिच्या आईवडीलांना किंवा मुलांना कुठल्याही प्रकारची शिवीगाळ करु नये किंवा हिंसाचार करु नये.

२. गैरअर्जदार यास पुढे आदेशित करण्यात येते की, अर्जदार ही काम करीत असलेल्या ठिकाणी किंवा दुकानात किंवा नातेवाईकांचे <u>घरी/इतर</u> ठिकाणी गेल्यास तिचा पाठलाग करु नये. त्याचप्रमाणे तिचेवर कुठल्याही प्रकारचा हिंसाचार करु नये असा प्रतिबंधात्मक अंतरिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

३. गैरअर्जदारने अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या जिवीतास हानी होईल असे कुठलेही कृत्य करु नये.

४. सदर आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना कलम २४ कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा अंतर्गत विनामुल्य देण्यात यावी.

५. सदरच्या आदेशाची प्रत संबंधित संरक्षण अधिकारी, संबंधित पोलीस स्टेशन, गडचिरोली यांना पाठविण्यात यावी.

६. सदरचा आदेश हा पुढील आदेशापर्यत कायम राहील.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VASANTI RAGHUNATH MALODE
Date: 2024.08.31 16:14:51 +1100

दि.३१/०८/२०२४
गडचिरोली.

**(व्ही. आर. मालोदे )**
२ रे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
गडचिरोली.